शासनमान्य ग्रामपंचायत ग्रंथालयांना सहाय्यक अनुदान (अनिवार्य) वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन निर्णय क्रमांक -मराग्रं-२०१९/प्र.क्र.९२/२०१९/साशि-५,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : २९ जून, २०१९.

वाचा : १) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३,दिनांक ०१.०४.२०१९.

२) ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.३२/२०१९-२०/५६४३ दिनांक २१.०६.२०१९.

प्रस्तावना :

राज्यातील शासनमान्य ग्रामपंचायत ग्रंथालयांच्या सहाय्यक अनुदानासाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी मागणी क्र. डब्ल्यू-४, २२०५- कला व संस्कृती, १०५ सार्वजनिक ग्रंथालये, (०४) स्थानिक क्षेत्राखालील योजना, (०४) (०१) महाराष्ट्र जिल्हा परिषदांना सहाय्यक अनुदाने (ग्रामपंचायत ग्रंथालयांना सहाय्यक अनुदाने) (२२०५ ११९६) (अनिवार्य) ३१-सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) यातंर्गत अंतरिम अर्थसंकल्पाद्वारे मंजूर निधीपैकी रु. ६९,९६,००० /- (अक्षरी रुपये एकोणसत्तर लाख शहान्नव हजार फ़क्त) इतका निधी संबंधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी यांना वितरित करुन खर्चास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय:

राज्यातील शासनमान्य ग्रामपंचायत ग्रंथालयांच्या सहाय्यक अनुदानासाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी मागणी क्र. डब्ल्यू-४, २२०५- कला व संस्कृती, १०५ सार्वजनिक ग्रंथालये, (०४) स्थानिक क्षेत्राखालील योजना, (०४) (०१) महाराष्ट्र जिल्हा परिषदांना सहाय्यक अनुदाने (ग्रामपंचायत ग्रंथालयांना सहाय्यक अनुदाने) (२२०५ ११९६) (अनिवार्य) ३१-सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) यातंर्गत अंतरिम अर्थसंकल्पाद्वारे मंजूर निधीपैकी रु. ६९,९६,००० /- (अक्षरी रुपये एकोणसत्तर लाख शहान्नव हजार फ़क्त) इतका निधी संबंधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयास वितरीत व खर्च करण्यास ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना शासन मान्यता देण्यात येत आहे. तसेच जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाच्या कार्यालय प्रमुखांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) या उद्दीष्टाखालील देयकावर नियंत्रक अधिकारी म्हणून प्रतिस्वाक्षरी करण्याचे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

२. सदर निधीचा विनियोग सन २०१८-१९ मध्ये निधी अभावी देय असलेले थकित परिरक्षण अनुदान आणि सन २०१९-२० मधील नियमित परिरक्षण अनुदान अदा करण्यासाठी करण्यात यावा.

३. सदरचा खर्च मागणी क्र. डब्ल्यू-४, २२०५- कला व संस्कृती, १०५ सार्वजनिक ग्रंथालये, (०४) स्थानिक क्षेत्राखालील योजना, (०४) (०१) महाराष्ट्र जिल्हा परिषदांना सहाय्यक अनुदाने (ग्रामपंचायत ग्रंथालयांना सहाय्यक अनुदाने) (२२०५ ११९६) (अनिवार्य) ३१-सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) या लेखाशिर्षातर्गत सन २०१९-२० मध्ये अर्थसंकल्पीत तरतूदीपैकी वितरीत केलेल्या निधीतून भागविण्यात यावा.

४. ग्रामपंचायत ग्रंथालयांना ECS/DBT/NEFT द्वारे ग्रामपंचायत खात्यामध्ये अनुदान जमा करण्यात यावे. अनुदानाच्या रक्कमेची उपयोगिता प्रमाणपत्रे संबंधित कार्यालय प्रमुखांनी विहित मुदतीत सादर करणे आवश्यक राहील.

५. सदरचा शासन निर्णय, शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थस-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.०१.०४.२०१९ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे. सदर परिपत्रकातील सूचनांचे पालन करण्यात यावे.

६. हा शासन निर्णय शासनाचे www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१९०६२९१४५३१९४२०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Anil Vithalrao Saware

Digitally signed by Anil Vithalrao Saware
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=073348b7a8767f0f7865422df1e65ce2f3bcdf6786e4712e2c088a9ac4ffee3f, cn=Anil Vithalrao Saware
Date: 2019.06.29 14:57:29 +05'30'

(अनिल वि. सावरे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महालेखापाल-१ (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
२. महालेखापाल -२ (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
४. ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
६. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
७. सर्व जिल्हा ग्रंथालय अधिकारी
८. सचिव (उ.व.तं.शि.) यांचे स्वीय सहाय्यक
९. कक्ष अधिकारी (साशि १), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. निवडनस्ती (साशि-५), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.